**खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५** **निशाणी क्र. १६२ क्रमशः**

साक्षीदार क्र. ८

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**

शपथेवर सुरु:—

३. माझे एकूण ३ बॅकांमध्ये खाते आहेत. या व्यतिरिक्त मी माझ्या ४ नातेवाईकांचे एकूण ६ बॅक खाते हे प्रज्योतकडे गुंतवणूकीसाठी पैसे पाठविताना वापरले आहेत. माझे बॅकेमध्ये जे ३ खाते आहेत त्या बॅकेचे नाव व शाखा मला सांगता येईल. त्या बॅकांची नावे अनुक्रमे सारस्वत बॅक, शाखा डोंबिवली, जि. ठाणे, स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा डोंबिवली पूर्व, जिल्हा. ठाणे, एचडीएफसी बॅक, डोंबिवली पूर्व, जिल्हा. ठाणे अशी आहेत. मी माझे नातेवाईक अनुक्रमे नामे सोनाली तुषार शिंदे हिचे टिजेएसबी बॅक, शाखा डोंबिवली पूर्व, जि. ठाणे, स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा डोंबिवली पूर्व, जिल्हा. ठाणे, इंडियन पोस्ट बॅक, शाखा डोंबिवली पूर्व, जि. ठाणे हे खाते प्रज्योतशी व्यवहार करताना वापरले होते. त्याचप्रमाणे दुसरे नातेवाईक चित्रा ज्ञानेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर सदाशिव शिंदे व वेंदात तुकाराम शिंदे यांचे देखिल बॅक खाते प्रज्योत याच्याशी व्यवहार करताना वापरले होते.

४. चित्रा ज्ञानेश्वर शिंदे व वेंदात तुकाराम शिंद यांचे कल्याण जनता सहकारी बॅक, शाखा डोंविबली पूर्व, जि. ठाणे, या बॅकेतील खाते प्रज्योत याच्याशी व्यवहार करताना वापरले होते. तर ज्ञानेश्वर सदाशिव शिंदे यांचे अभिनव सहकारी बॅक, शाखा डोंविबली पूर्व, जि. ठाणे, हे खाते प्रज्योत याच्याशी व्यवहार करताना वापरले होते.

५. मी प्रज्योत याच्याशी व्यवहार करताना वर संदर्भीत केलेल्या ९ बॅकांचे खाते उतारे हे मी कायदयानुसार आवश्यक असणा—या प्रमाणपत्रासह दाखल केले असून खाते उतारे व प्रमाणपत्र अनुक्रमे **नि.क्र. १४५ ते नि.क्र. १६१** वर आहेत. माझे दि. ०१.०४.२०२१ ते दि. ०६.११.२०२४ या कालावधीमध्ये प्रज्योत याच्याशी जे व्यवहार झालेले आहेत त्याच्या नोंदी खाते उता—यामध्ये नमूद असून त्या मी खाते उता—यावर अधोरेखित केलेल्या आहेत. सदरील खाते उता—यामध्ये मी प्रज्योतला पाठवलेल्या रक्कमा या केसरी रंगाने अधोरेखित करुन दर्शवल्या असून त्याच्याकडून प्राप्त झालेल्या रक्कमा या हिरव्या रंगाने अधोरेखित करुन दर्शवल्या आहेत. मी दि. ०१.०४.२०२१ ते दि. ०६.११.२०२४ या कालावधीत वर नमूद ९ बॅक खात्याव्दारे मी प्रज्योत यास रु. ३३,४९,९९९/— रुपये पाठवले होते. त्या बदल्यात मला प्रज्योत याच्याकडून याच वर नमूद ९ बॅक खात्याच्यामाध्यामातून एकूण रक्कम ७२,६४,५००/— प्राप्त झाली होती. मी पुन्हा सांगतो मी वर नमूद ज्या ९ बॅक खात्याच्या उल्लेख केलेला आहे त्यापैकी माझी पत्नी सोनाली तुषार शिंदे हिच्या इंडियन पोस्ट बॅक, शाखा डोंबिवली, जि.ठाणे या बॅक खात्याच्या माध्यामातून कुठलीही रक्कम प्रज्योत यास पाठवण्यात आली नव्हती. परंतु सदरील कालावधीत माझ्या पत्नीच्या सदरील खात्यात प्रज्योत याच्याकडून रु. १,७०,०००/— प्राप्त झाले होते. माझे वडील ज्ञानेश्वर सदाशिव शिंदे यांचे खाते असलेली बॅक अभिनव सहकारी बॅक, शाखा डोंबिवली, जि.ठाणे या बॅक खात्यात प्रज्योत याच्याकडून कुठलीही रक्कम पाठवण्यात आली नाही. मात्र त्या खात्याव्दारे प्रज्योत यास रु. ८,००,०००/— रुपये पाठवण्यात आले होते.

**न्यायालय प्रश्न क्र. १ :—** तुम्ही स्वत: अधिकृत गुंतवणूक सल्लागार आहात का?

**उत्तर:—** मी अधिकृत गुंतवणूक सल्लागार नाही.

**न्यायालय प्रश्न क्र. २ :—** आरोपी प्रज्योत याच्याकडे गुंतवणूक करण्यासाठी गुंतवणूक सल्लागार म्हणून शासकिय अथवा निमशासकिय वित्त व गुंतवणूक संस्थांचा परवाना होता काय?

**उत्तर:—** आरोपी प्रज्योत याच्याकडे देखिल गुंतवणूकीसाठी पैसे स्विकारण्याचा परवाना नव्हता.

**न्यायालय प्रश्न क्र. ३:—** तुम्हाला प्रज्योत भागवत याच्याकडून ज्या रक्कमा प्राप्त झाल्याचे मी सांगितले आहे त्या रक्कमा त्याने कुठल्या योजनेमध्ये रक्कम गुंतवल्यानंतर प्राप्त झाल्या होत्या याबाबत आपल्याला कागदोपत्री पुरावा दाखवला होता काय?

**उत्तर:—** नाही. मला दर महिन्याला प्रज्योतकडून पैसे प्राप्त होत होते म्हणून मी त्याबाबत अधिकची चौकशी केली नाही.

**न्यायालय प्रश्न क्र. ४:—** तुम्हाला प्रज्योत भागवत याच्याकडून जी रक्कम मिळाली ती बाब आयकर विभागाला कळवली होती काय?

**उत्तर:—** नाही.

**<u>उलटतपास आरोपीकरीता ॲड. अजय वर्मा यांचेतर्फे :—</u>**

(ॲड. अजय वर्मा गैरहजर. त्यांचे सहा. कपिल वर्मा हजर ॲड. श्री. कपिल वर्मा यांनी असे प्रतिपादन केले की, जेष्ठ वकिल श्री. हर्षद पालवे हे दि. ११.०३. २०२६ रोजी उपलब्ध होणार असून उलटतपास दि. ११.०३.२०२६ रोजी पर्यंत तहकुब करावा. सबब, उलटतपास दि. ११.०३.२०२६ रोजी पर्यंत तहकूब.)

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०५/०३/२०२६.**